सन २०१५-१६ अंतर्गत सचिवालयीन आर्थिक सेवा- (०१) (०१) सहकार, पणन व वस्त्रोद्याग विभाग (दत्तमत) (३४५१०३०४)- १३ कार्यालयीन खर्च अंतर्गत पूरक मागणीद्वारे हिवाळी अधिवेशनात प्राप्त झालेल्या रु.९,२८,०००/- इतक्या तरतूदीपैकी वित्त विभागाच्या आदेशानुसार सदर तरतूदीच्या ५०% रक्कम मुक्त करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- पूरक२०१५/प्र.क्र.१८०/आस्था-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- २७ जानेवारी, २०१६

संदर्भ :- (१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३,दि.१७/४/२०१५
(२) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.पूरक-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३,दि.१.१.२०१६
(३) शासन निर्णय, स.प.व व.विभाग क्र.पूरक-२०१५/प्र.क्र११०/२०१५/१७-स, दि.२.१.२०१६
(४) शासन पत्र स.प.व व.विभाग क्र.पूरक२०१५/प्र.क्र.११०/१५/१७-स दिनांक १.१.२०१६

प्रस्तावना :-

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाचे खर्चाचे पूरक विवरणपत्र दिनांक ८.१२.२०१५ रोजी विधानमंडळास सादर करण्यात आले. सदर पूरवणी खर्चास विधानसभेने मान्यता दिलेली आहे. दिनांक ३१.३.२०१६ रोजी संपणाऱ्या वित्तीय वर्षाच्या विनियोजनामध्ये समाविष्ट करण्यासाठी पूरवणी विनियोजन विधेयकास मा. राज्यपालांनी संमती दिलेली आहे आणि ते महाराष्ट्र (पृतीय पुरवणी) विनियोजन अधिनियम २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग-४ दिनांक २१.१२.२०१५ यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

यामध्ये सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिता सचिवालयीन आर्थिक सेवा- (०१) (०१) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग (दत्तमत) (३४५१०३०४)- १३ कार्यालयीन खर्च अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या रु.९,२८,०००/- इतक्या रक्कमेच्या पुरवणी मागणीचा समावेश आहे. वित्त विभागाकडून प्रशासकीय विभागस्तरावर पूरक मागणीच्या ५०% निधी वितरणास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सचिवालयीन आर्थिक सेवा- (०१) (०१) सहकार, पणन व वस्त्रोद्याग विभाग (दत्तमत) (३४५१०३०४)- १३ कार्यालयीन खर्च या योजनेंतर्गत रु.४.६४ लाख इतकी तरतूद वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१५-१६ अंतर्गत सचिवालयीन आर्थिक सेवा- (०१) (०१) सहकार, पणन व वस्त्रोद्याग विभाग (दत्तमत) (३४५१०३०४)- १३ कार्यालयीन खर्च अंतर्गत रु.९,२८,०००/- इतक्या रक्कमेच्या पुरवणी मागणीच्या प्रस्तावास माहे डिसेंबर २०१५ च्या हिंवाळी अधिवेशनात मंजूरी प्राप्त झालेली आहे. तथापि, वित्त विभागाने त्यांच्या संदर्भीय दिनांक १.१.२०१६ च्या परिपत्रकान्वये सदर तरतूदीच्या ५०% निधी वितरित करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरून मंजूर पूरक अनुदानाच्या ५०% मर्यादेत रु.४,६४,०००/- (रुपये चार लाख चौसष्ट हजार फक्त) इतके अनुदान नियंत्रक अधिकारी, श्री. मो. का. भोये, सह सचिव (रोखशाखा), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मुक्त करण्यात यावे.

२. यावर होणारा खर्च मागणी क्र.व्ही-२, सचिवालयीन आर्थिक सेवा- (०१) (०१) सहकार, पणन व वस्त्रोद्याग विभाग (दत्तमत) (३४५१०३०४)- १३ कार्यालयीन खर्च (योजनेतर) या शीर्षाखाली चालू आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदरचा निधी वितरीत करण्याकरिता श्रीमती. अ.म.जोशी , कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून श्री.मो. का. भोये, सह सचिव (रोखशाखा), सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. वित्त विभागाच्या दि.१.१.२०१६ च्या शासन परिपत्रकात नमूद केल्यानुसार केल्यानुसार सदर पुरवणी मागणी कोणत्याही अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्य करण्यात आलेली नाही. तसेच, संबंधित लेखाशिर्षाखालील मूळ तरतूद संपूर्णत: खर्च झाल्याशिवाय या शासन निर्णयान्वये मुक्त करण्यात आलेला निधी खर्च करण्यात येऊ नये.

५. पुरवणी मागणी ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली आहे. त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्याची दक्षता संबंधित नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी. सदर निधी खर्च करताना शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१५/ प्र.क्र८५/ अर्थसंकल्प-३, दि.१७.०४.२०१५ मधील सर्व तरतूदींचे पालना करण्याबाबत दक्षता घ्यावी.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने क्र.पूरक-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३,दि.१.१.२०१६ च्या परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२७१६३७३६३००२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Geeta Hemant Rane

Digitally signed by Geeta Hemant Rane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Assistant, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Geeta Hemant Rane
Date: 2016.01.27 16:38:50 +05'30'

(गी. हे. राणे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर
२) महालेखापाल, (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर
३) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
४) कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मुंबई (२ प्रती)
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
७) वित्त विभाग (व्यय २ / अर्थ-३), मंत्रालय, मुंबई.
८) अवर सचिव (१७-स), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) निवड नस्ती (आस्था-२), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.